# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.01.2026** **वारःरविवार**

---

- अठराव्या रोजगार मेळाव्यात देशभरातील 61 हजार युवकांना रोजगार नियुक्तिपत्रं प्रदान.
- पंतप्रधान आज आकाशवाणीवरील 'मन की बात'मधून साधणार संवाद.
- आकाशवाणीच्या वृत्त सेवा विभागाला मतदार शिक्षण जागृतीवरील सर्वोत्तम मोहीमेसाठी पुरस्कार.

आणि

- भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज गुवाहाटीत वीस षटकांचा तिसरा सामना. वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेत बांग्लादेशऐवजी स्कॉटलंडचा समावेश.

**<u>रोजगार-डेस्क,</u>**

भारत अनेक देशांसोबत करार करत असल्यामुळे देशातील कुशल तरुणांसाठी संधी उपलब्ध होत असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी काल अठराव्या राष्ट्रीय रोजगार मेळ्याला संबोधित करताना सांगितलं. विविध राज्यांमधील 61 हजार युवकांना या मेळ्यात रोजगार नियुक्तिपत्रं प्रदान करण्यात आली. ही नियुक्तीपत्रं राष्ट्रनिर्माणासाठी एक आमंत्रण आहे. विकसित भारताच्या दिशेनं तरुणांना मार्गदर्शन करण्यासाठी एक संकल्पपत्र आहे असं मोदी म्हणाले.

पुण्यात केंद्रीय सहकार आणि विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ग्रुप सेंटरवर मेळावा आयोजित करण्यात आला होता . एकंदर 300 पैकी 25 युवकांना प्रातिनिधीक स्वरुपात मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्रं देण्यात आली. सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी, एसएसबी, आसाम रायफल्स, बँक ऑफ बडोदा, युनियन बँक ऑफ इंडिया, ईपीएफओ, आयआयजीएम या विभागांमध्ये युवकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**<u>PREZ-ADDRESS</u>**

७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज राष्ट्राला संबोधित करणार आहेत. हे संबोधन आकाशवाणीच्या सर्व राष्ट्रीय वाहिन्यांवर संध्याकाळी सात वाजता आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर हिंदीमध्ये प्रसारित केलं जाईल. हिंदी आणि इंग्रजीमधील संबोधनाच्या प्रसारणानंतर, दूरदर्शनच्या प्रादेशिक वाहिन्यांवरून प्रादेशिक भाषांमध्ये त्याचं प्रसारण केलं जाईल. आकाशवाणीवरून रात्री साडे नऊ वाजता प्रादेशिक भाषेमधून ते प्रसारित केलं जाणार आहे.

**<u>मनकिबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमातून देश-विदेशातील भारतीयांसमोर आपले विचार मांडणार आहेत. हा या मासिक रेडिओ कार्यक्रमाचा १३० वा भाग असेल. हा कार्यक्रम संपूर्ण आकाशवाणी आणि दूरदर्शनवर, एआयआर न्यूजच्या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन ए आय आर मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल. तसेच, तो ए आय आर न्यूज, डीडी न्यूज, पंतप्रधान कार्यालय त्याचबरोबर माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवर थेट प्रक्षेपित केला जाईल. आकाशवाणी हिंदी प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमध्ये या कार्यक्रमाचं प्रसारण केलं जाणार आहे.

**मतदार-दिन**

निवडणूक आयोग आज नवी दिल्लीत १६ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी असून त्या अध्यक्षस्थान भूषवतील. या वर्षीच्या राष्ट्रीय मतदार दिनाची संकल्पना 'माझा भारत, माझं मत' अशी असून, 'भारतीय लोकशाहीच्या केंद्रस्थानी नागरिक' ही यंदाच्या दिनाचं ब्रीदवाक्य आहे. या सोहळ्यादरम्यान, राष्ट्रपती नव्याने नोंदणी केलेल्या तरुण मतदारांना मतदार छायाचित्र ओळखपत्र प्रदान करतील तसंच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, निवडणूक व्यवस्थापन, मतदार जागृती उपक्रम यांसह विविध श्रेणींमध्ये सर्वोत्कृष्ट निवडणूक पद्धती पुरस्कार आणि माध्यमांसाठी विशेष पुरस्कारदेखील देणार आहेत.

**AKASHVANIAWARD**

आकाशवाणीच्या वृत्त सेवा विभागाला २०२५ वर्षासाठी 'मतदार शिक्षण जागृतीवरील सर्वोत्तम मोहीम' या श्रेणीमध्ये इलेक्ट्रॉनिक रेडिओसाठीचा माध्यम पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार आज नवी दिल्लीत राष्ट्रीय मतदार दिनाच्या सोहळ्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढवण्यासाठी आणि निवडणुकांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आकाशवाणीने दिलेल्या योगदानासाठी हा पुरस्कार दिला जात आहे.

**चित्ररथ**

गृह मंत्रालय या वर्षीच्या प्रजासत्ताक दिन संचलनामध्ये नवीन न्याय संहितांच्या देशव्यापी अंमलबजावणीचे प्रदर्शन करणारा आपला चित्ररथ सादर करणार आहे. हा चित्ररथ १ जुलै २०२४ पासून लागू झालेल्या भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम यांच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या परिवर्तनकारी सुधारणांबाबत माहिती देणार आहे. या चित्ररथात डिजिटल पुराव्यांसाठी ई-साक्ष, राष्ट्रीय स्वयंचलित फिंगरप्रिंट ओळख प्रणाली, ई-समन, आभासी न्यायालयीन प्रक्रिया आणि पोलीस, न्यायवैद्यक, न्यायालये आणि तुरुंगांना जोडणारी एकात्मिक फौजदारी न्याय प्रणाली यांचा समावेश आहे.

**बालिकादिन**

राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त काल देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. प्रत्येक मुलीला सन्मान, संधी आणि आशेचं जीवन जगता यावं यासाठी आपला देश पुन्हा एकदा निर्धार व्यक्त करत

असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे. गेल्या दहा वर्षांत देशाने मुलींच्या चांगल्या शिक्षण, कौशल्य विकास आणि आरोग्यावर लक्ष केंद्रित केलं असल्यानं मुली प्रगती करू शकत असून विकसित भारताच्या निर्मितीमध्ये प्रभावीपणे योगदान देत असल्याचंही मोदी यांनी म्हटलं आहे.

**वीरगाथा**

संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ आणि शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी काल नवी दिल्ली इथं संरक्षण आणि शिक्षण मंत्रालयांचा संयुक्त उपक्रम वीर गाथा पुरस्कार सोहळ्यात १०० विजेत्यांना सन्मानित केलं. यावर्षीच्या पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्रातल्या १९ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. देशभरातील ९१ शाळांमधून राष्ट्रीय स्तरावर तीन श्रेणींमध्ये विजेत्यांची निवड करण्यात आली. प्रत्येक विजेत्याला दहा हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि कर्तव्य पथावरील प्रजासत्ताक दिनी विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याची संधी मिळणार आहे.

**पंचायतराजपाहुणे**

पंचायत राज मंत्रालयाच्यावतीनं आज नवी दिल्लीत नवनिर्वाचित पंचायत प्रतिनिधींना सन्मानित करण्यात येणार आहे. या प्रतिनिधींना प्रजासत्ताक दिन संचलन पाहण्यासाठी विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आलं आहे. या प्रतिनिधींमध्ये केंद्र शासनाच्या प्रमुख योजनांमध्ये पूर्ण सहभाग घेतलेल्या पंचायतीमधले एकंदर २४० सरपंच, मुखिया, ग्रामप्रधान तसंच ब्लॉक आणि  जिल्हा पंचायत अध्यक्षांचा समावेश आहे.यावेळी युनिसेफच्या सहकार्यानं मंत्रालयानं विकसित केलेल्या पंचायत सहाय्य आणि संदेश सेवा-पंचम चॅटबॉटचं उद्घाटन करण्यात येणार आहे. पंचम हे पंचायत प्रतिनिधी, अधिकारी आणि नागरिकांशी थेट, समयोचित आणि दोन्ही बाजूंनी संवाद साधण्याचं  साधन आहे. यामुळे योजनांबद्दलची माहिती,प्रशिक्षण सामग्री,पंचायत सेवांशी संबंधित सूचना आणि माहिती सहज उपलब्ध होणार आहे.

**पुनरीक्षण**

मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षणाबाबत प्रशासनिक उपाय अधिक कडक करण्यात येणार आहेत. सुनावणीदरम्यान सादर केलेल्या पुनरीक्षणाशी संबंधित प्रत्येक अहवाल आणि दस्तऐवज निवडणूक आयोगाच्या ईसीआय नेट पोर्टलवर त्याच दिवशी अपलोड करण्याचे निर्देश मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं राज्यातल्या सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना दिले आहेत. याकडे दुर्लक्ष केल्यास त्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचंही या सूचनेत स्पष्ट करण्यात आलं आहे.

**CRICKET-U19**

युवकांच्या १९ वर्षांखालील क्रिकेट विश्वचषकात, भारताने झिम्बाब्वेमधील बुलावेयो येथे न्यूझीलंडचा सात गडी राखून पराभव केला. पावसामुळे हा सामना  ३७ षटकांचा करण्यात आला होता. न्यूझीलंडने दिलेल्या १३० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, भारताने हे लक्ष्य केवळ ८० चेंडूत पूर्ण केलं. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडचा संघ  १३५ धावांवर सर्वबाद झाला. डीएलएस पद्धतीनुसार, भारतासाठी सुधारित लक्ष्य १३० धावांचे देण्यात आले होते. भारताकडून कर्णधार आयुष म्हात्रेने २७ चेंडूत ५३ धावा केल्या, तर वैभव

सूर्यवंशीने २३ चेंडूंत ४० धावांचे योगदान दिले. गोलंदाजीमध्ये, आर.एस.अंबरीशने चार बळी घेतले तर हेनिल पटेलने तीन बळी मिळवले.आर.एस. अंबरीशला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील  तिसरा क्रिकेट सामना आज गुवाहाटी इथं खेळला जाणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामना सुरू होणार आहे. या मालिकेत भारताने २-० अशी आघाडी घेतली असून आजचा सामना जिंकून भारत मालिका विजयाच्या दृष्टीने प्रयत्न करेल.

दरम्यान ७ फेब्रुवारीपासून भारत आणि श्रीलंका येथे होणाऱ्या वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेत बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडचा समावेश करण्याची घोषणा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने केली आहे. आयसीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजोग गुप्ता यांनी माहिती दिली की, बांगलादेशने आपले नियोजित सामने भारताबाहेर हलवण्याची केलेली मागणी आयसीसीच्या धोरणाशी सुसंगत नव्हती.

**वादळअमेरिका**

अमेरिकेत शक्तिशाली हिवाळी वादळामुळं लाखो लोकांना मुसळधार बर्फवृष्टी, जोरदार पाऊस आणि तीव्र थंड वाऱ्याच्या लाटांचा धोका निर्माण झाला आहे. या वादळामुळे मिडवेस्ट, पूर्व किनारा आणि दक्षिणेकडील भागावर परिणाम होण्याची शक्यता असून, त्यामुळे प्रवासात व्यत्यय येईल आणि वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका वाढेल. विमानांच्या उड्डाणांमध्ये आधीच व्यत्यय आला आहे आणि काही भागांमध्ये रस्ते प्रवास धोकादायक किंवा अशक्य होण्याची शक्यता आहे. बर्फाच्छादित रस्तेआणि कमी दृश्यमानतेमुळे वाहन चालवणे अत्यंत धोकादायक ठरू शकते असा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज पंजाब, चंदीगड, हरियाणा आणि दिल्लीमध्ये दाट धुक्याचा इशारा दिला आहे. तर या राज्यांसह उद्यापर्यंत हिमाचल प्रदेशसह राजस्थानमध्ये थंडीच्या लाटेची शक्यता विभागाने वर्तवली आहे. तर आज आज तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलमध्ये मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.